फ्रान्स मधील ICGM-University Montpellier येथील पीएच.डी. अभ्यासक्रमाकरिता श्रीम. किरण नारायण ताकसांडे, सहाय्यक प्राध्यापक, रसायनशास्त्र, इस्माईल युसुफ महाविद्यालय, मुंबई यांना अध्ययन रजा मंजूर करणेबाबत.

# महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्रशिक्षण विभाग
शासन निर्णय क्र. रजामं २०१७/(२०१/१७)/मशि-१
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : ३१ ऑक्टोबर, २०१८.

**वाचा** :

१. संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांचे पत्र क्र. उशिसं-२०१७/टे.क्र.२/प्राध्यापक/प्रशा-१/१०१५२, दि. २३.०८.२०१७.
२. संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांचे पत्र क्र. उशिसं-२०१७/टे.क्र.२/अध्ययन रजा/प्रशा-१/११६७४, दि. ०४.१०.२०१७.
३. संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांचे पत्र क्र. उशिसं-२०१८/टे.क्र.२/अध्ययन रजा/प्रशा-१/५९४४, दि. २५.०५.२०१८.

**शासन निर्णय** :-

श्रीम. किरण ताकसांडे, सहाय्यक प्राध्यापक, इस्माईल युसुफ महाविद्यालय, मुंबई यांची फ्रान्स मधील ICGM-University Montpellier येथील ३ वर्षाच्या पीएच.डी. अभ्यासक्रमाकरिता निवड झाली आहे. सदर अभ्यासक्रमाकरिता त्यांना खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून अध्ययन रजा मंजूर करण्यात येत आहे.

१. श्रीम. ताकसांडे ह्यांना महाविद्यालयातून कार्यमुक्त केल्याच्या दिनांकापासून त्यांचा अध्ययन रजेचा कालावधी सुरु होईल.
२. सदर अध्ययन रजेमुळे महाराष्ट्र शासनावर कोणताही आर्थिक भार पडणार नाही.
३. श्रीम. ताकसांडे यांना संशोधनामुळे मिळालेली अर्हता ही विशेष बाब म्हणून त्यांच्या सेवाज्येष्ठता, पदोन्नती किंवा अन्य कारणांसाठी ग्राह्य धरली जाणार नाही.
४. संशोधन पूर्ण करण्यासाठी आवश्यक असलेला २ वर्षाचा कालावधी कर्तव्य कालावधी म्हणून समजण्यात यावा. श्रीम. ताकसांडे यांचा अभ्यासक्रम तीन वर्षासाठीचा असल्याने सदर अभ्यासक्रमाकरिता दोन वर्षापेक्षा अधिक रजा मंजूर करावयाची झाल्यास तेवढ्या कालावधीची (जास्तीत जास्त १ वर्ष) असाधारण रजा मंजूर करता येईल.
५. सदर कालावधी कोणत्याही परिस्थितीत वाढवून दिला जाणार नाही.
६. श्रीम. किरण ताकसांडे यांना सदर कालावधीत नियमानुसार वेतन व भत्ते याशिवाय अन्य कोणतेही पूरक भत्ते देय असणार नाहीत.
७. श्रीम. ताकसांडे यांनी सदर कालावधीत कोणत्याही संस्थेकडून प्रवासखर्च, विदेशी वास्तव्याचा खर्च व अन्य कोणत्याही प्रकारचे आदरातिथ्य स्वीकारु नये.
८. त्यांच्या पदावर शासनाने विहित केलेल्या कार्यपद्धतीनुसार अध्यापकाची (सहाय्यक प्राध्यापकाची) नेमणूक करण्यात यावी. सदर नियुक्ती वरील कालावधीपुरतीच मर्यादित राहील, असा उल्लेख नियुक्ती आदेशात करण्यात यावा.
९. श्रीम. ताकसांडे यांना मंजूर केलेला कर्तव्य कालावधी संपताच त्यांनी आपल्या मूळ पदावर रुजू व्हावे व रुजू अहवाल शासनास विनाविलंब सादर करावा.
१०. श्रीम. ताकसांडे ह्यांनी यशस्वीपणे पूर्ण केलेल्या संशोधनाचा अहवाल शासनास सादर करणे बंधनकारक राहील.
११. उपरोक्त संपूर्ण कालावधीत श्रीम. ताकसांडे यांच्याकडून म.ना.से. (वर्तणूक) नियम, १९७९ मधील कोणत्याही तरतुदींचा भंग केला जाणार नाही याची दक्षता घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(म. प्र. किणी)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) अपर मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

२) प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

३) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.

४) विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, मुंबई.

५) प्राचार्य, इस्माईल युसुफ महाविद्यालय, मुंबई.

६) श्रीम. किरण ताकसांडे, सहाय्यक प्राध्यापक, इस्माईल युसुफ महाविद्यालय, मुंबई.

७) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई.

८) लेखा व अधिदान अधिकारी, मुंबई.

९) निवडनस्ती (मशि-१).

Government of Maharashtra's
Ismail Yusuf College of
Arts, Science & Commerce.
Jogeshwari (East), Mumbai - 400 060.